# मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (SMART)

## प्रकल्प अंमलबजावणी कक्ष – कृषि

कृषि भवन, सहावा मजला, डीटीसी माल, वकील नगर, एरंडवणे, पुणे

Email: - smart.piuagri@gmail.com


स्मार्ट/प्र.अं.क.-कृषि/ GRM तक्रार / ३३३ /२०२६ दिनांक: २५/०२/२०२६

प्रति,

मा. अतिरिक्त प्रकल्प संचालक

स्मार्ट प्रकल्प

विषय: स्मार्ट प्रकल्पांतर्गत GRM तक्रारी संदर्भात – Pre Bid Meeting व Software Specification बाबत खुलासा

संदर्भ:

१. PCMU यांचे पत्र क्र. १५१ दिनांक ३०/०१/२०२६

२. GRM प्रणालीतील तक्रार क्र. SMART_०००००००५८

३. नोडल अधिकारी यांचे पत्र क्र. १२३६ दिनांक ०५/०२/२०२६

उपरोक्त विषयास अनुसरून अमरावती विभागातील समुदाय आधारित संस्थांच्या मंजूर उपप्रकल्पातील मशिनरी संपादनाच्या निविदेमध्ये पारदर्शकतेचा अभाव असल्याची तक्रार श्री. धरम जीत यांनी संदर्भ क्र. २ अन्वये दाखल केली होती. त्या अनुषंगाने नोडल अधिकारी यांनी त्यावरील खुलासा संदर्भ पत्र क्र. ३ अन्वये सादर केलेला आहे. तो प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्षास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येत आहे.

नोडल अधिकारी,

प्रकल्प अंमलबजावणी कक्ष कृषि

स्मार्ट प्रकल्प

# महाराष्ट्र शासन - कृषि विभाग

**मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामिण परीवर्तन प्रकल्प (स्मार्ट)**

**विभागीय अंमलबजावणी कक्ष स्मार्ट, अमरावती**

पिन कोड-४४४६०२ ई-मेल: amravati.riu.smart@gmail.com


जा.क्र./स्मार्ट/ प्रमुख,वि. अं. कक्ष स्मार्ट, अमरावती/ 1236 /2026 दिनांक :- 05/02/2026

प्रति,

प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU),
(SMART) प्रकल्प, पुणे.

विषय : SMART प्रकल्पांतर्गत GRM तक्रारीसंदर्भात – Pre-Bid Meeting व Software Specification बाबत खुलासा.

संदर्भ : 1. PCMU यांचे पत्र क्र. १५१, दिनांक २०२५-२६

२. GRM प्रणालीतील तक्रार क्रमांक SMART_०००००००५८

महोदय,

वरील संदर्भानुसार, तसेच GRM प्रणालीतील प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे तथ्यात्मक खुलासा सादर करण्यात येत आहे कि, SMART प्रकल्पांतर्गत संबंधित निविदा प्रक्रियेसाठी शासनाच्या प्रचलित निविदा नियमावलीनुसार Pre-Bid Meeting आयोजित करण्यात आली होती. तथापि, सदर Pre-Bid Meeting साठी कोणतीही कंपनी / निविदाधारक प्रत्यक्ष उपस्थित राहिलेला नव्हता, सदर बाबतची नोंद जिल्हा अमलबजावणी कार्यालयत अभिलेखामध्ये उपलब्ध आहे.

तसेच सदर तक्रार मध्ये नोंदविलेल्या निविदा दस्तऐवजामध्ये कोणत्याही विशिष्ट कंपनीच्या Software / प्रणालीचे नाव, ब्रँड, ट्रेडनेम किंवा मालकी हक्काशी संबंधित कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. निविदेतील सर्व तांत्रिक अटी व तपशील हे कार्यात्मक (Functional) व कामगिरी-आधारित (Performance Based) स्वरूपाचे आहेत.त्यामुळे कामगिरी आधारित कार्यकरणारे कोणतेही समतुल्य Software वापरण्याची मुभा निश्चितच आहे.

निविदेतील अटी व शर्ती या स्पर्धात्मक, खुल्या व भेदभावरहित (Open, Competitive and Non-Discriminatory) असून, पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या इतर कोणत्याही कंपनीचे Software प्रस्तावित करण्यास पूर्णतः मुभा देण्यात आलेली आहे.

त्यामुळे सदर निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही विशिष्ट कंपनीला लाभ देण्याचा, मर्यादा घालण्याचा अथवा पक्षपात करण्याचा कोणताही उद्देश किंवा कृती आढळून येत नाही. उपलब्ध अभिलेख, निविदा दस्तऐवज व कार्यवाहीनुसार RIU, अमरावती विभागाकडे सदर बाबतीत कोणताही आक्षेप, हरकत किंवा नियमबाह्य बाब निदर्शनास आलेली नाही. करिता माहिती व पुढील कार्यवाही करिता सादर.

**नोडल अधिकारी**
**विभागीय अंमलबजावणी कक्ष,**
**स्मार्ट, अमरावती**

**प्रत:-** १) नोडल अधीकारी,जिल्हा अंमलबजावणी कक्ष, अमरावती.